जून २०१५ | ₹ ४० | पुणे, वर्ष ५ | अंक ०७

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत

# अर्थपूर्ण

## अशाने कसे आणि का येतील अच्छे दिन?

गिरीश कुबेर यांचे अर्थक्रांतीत स्वागत असो..

शेतीविषयी पनगारीया असे का म्हणतात?

आपले या बदलाकडे लक्ष आहे ना?

२०००० टन सोन्याचे रुपये झाले तर!

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

editor.arthapurna@gmail.com

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
११, 'हर्षदा', रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे ४११०३८
फोन : ०२०- २५४३०५४०
www.arthapurna.org


# अर्थपूर्ण


जून २०१५

वर्ष पाचवे
अंक सातवा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
९८८१०९८०१०

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
०२०-२५४३०५४०
९९२१९२६५३८
arthapurna.monthly@gmail.com

**वितरण आणि जाहिरात संपर्क**
प्रशांत देशपांडे
९८५०२३३७७७
विजय दबडगावकर
९८९०१००९८४
राजन मिडिया स्टेशन
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५



'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर


## अनुक्रमणिका


०४ अशाने कसे आणि का येतील 'अच्छे दिन'?...यमाजी मालकर
०६ २० हजार टन सोन्याचे रुपये झाले तर !...यमाजी मालकर
०८ गिरीश कुबेर यांचे अर्थक्रांतीत स्वागत असो!
१० अर्थक्रांती न्यूज
१२ डेन्मार्क कॅशलेस इकॉनॉमिकडे
१३ ग्रीस आणि बँक व्यवहार कर
१४ अर्थक्रांतीच्या दिशेने
१६ अर्थभान
२८ शेअरबाजारः प्रवाहाच्या विरोधी, विचारसरणी आवश्यक...प्रसाद भागवत
३१ गुंतवणूक करण्यासाठीच्या चांगल्या ५० कंपन्या
३२ व्यासपीठ
३३ आर्थिक स्वातंत्र्यासाठी चला रिझर्व बँकेत...

# भूमिका

# अशाने कसे आणि का येतील 'अच्छे दिन'?



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**शुद्ध आणि पुरेशी हवा, पाणी आणि रक्त हे जसे आरोग्यदायी जगण्यासाठी आवश्यक आहे, तसेच पैशाचे प्रवाहीपण आणि शुद्धीकरण ही 'अच्छे दिन'ची पूर्वअट आहे. सुजाण म्हणविणारे काही धुरीण त्याच्याविषयी न बोलता भारतीयांच्या वृत्तीवर तेच ते बोलून दिशाभूल करत आहेत. ती दिशाभूल थांबेल, तेव्हा 'अच्छे दिन'चा खरा प्रवास सुरु होईल. तो प्रवास ज्या ट्रॅकवरून होऊ शकतो, त्याचे नाव अर्थक्रांती. अर्थक्रांती समजून घेतली पाहिजे, ती त्यासाठी!**

नरेंद्रमोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला गेल्या महिन्यात एक वर्ष पूर्ण झाले. निवडणुकीनंतर लवकरच देशात चांगले दिवस येतील, असे आश्वासन मोदी यांनी दिले होते. पण कोठे आहेत ते 'अच्छे दिन', असा एक नवा आक्रोश देशात तयार झाला आहे. १२६ कोटी लोकांचे समाधान होईल, असे आमुलाग्र काही एका वर्षांत घडू शकते, असे ज्या मतदारांनी मानले आणि जे आज भ्रमनिरास झाला, असे म्हणत आहेत, ते सर्वच स्वत:ची फसवणूक करून घेत आहेत. नरेंद्र मोदी नावाचा एक नेता हा सर्व देश बदलून टाकेल, असे मानणे हीच मुळात मोठी चूक आहे.

एकतर ज्या देशात सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक इतके वैविध्य आहे, त्याच्या चांगल्या दिवसांची व्याख्या करणे अशक्य आहे. दुसरे म्हणजे ज्या व्यक्तीवादी आणि भावनिक आंदोलनांवर भारतीय समाज उभा आहे, तोच त्याच्या चांगल्या दिवसांकडे जाणारा सर्वात मोठा अडथळा आहे. तिसरे म्हणजे जागतिकीकरणाने आशा-आकांक्षांची क्षितिजे इतकी अमर्याद आणि भौतिकतावादी केली आहेत की कितीही मिळाले तरी समाधान होण्याची सुतराम शक्यता राहिलेली नाही. चौथे म्हणजे त्या चांगल्या दिवसांची सुरवात (समजा) सरकार करणार असेल तर त्या सरकारसोबत देश उभा राहावा लागतो, जे भारतासारख्या विघटीत समाजात आजपर्यंत शक्य झालेले नाही. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या भेदभावमुक्त व्यवस्थेचे स्वप्न समाज पाहतो आहे, त्यासाठी नेमक्या कोणत्या बदलांना महत्व द्यावे लागेल, याविषयी आज समाजात एकमत नाही. इतक्या विसंगतीमध्ये 'अच्छे दिन' वर्षभरात येणार, असे कोणी म्हणत असेल तर ते 'अच्छे दिन' त्यांना लखलाभ होवोत!

ज्या समाजाची जशी पात्रता असते, त्यानुसारच त्याला राज्यकर्ते मिळतात, हे माझे अतिशय नावडते वाक्य आहे. मात्र 'अच्छे दिन'ची चर्चा ज्या उथळपणेगेले काही महिने सुरु आहे, ती पाहिली की घडीभर ते खरे वाटते. मुळात देशात जादू केल्यासारखे काही होणार आहे, असे कोणी सांगितले आणि आता ती जादू होण्याची वाट आम्ही पाहतो आहोत, हाच मुळी खुळचटपणा आहे. जगातली सर्वात मोठी लोकशाही म्हणून अभिमान बाळगायला हरकत अजिबात नाही, मात्र ती जी अर्थसत्तेच्या दावणीला बांधली आहे, तिला सोडविण्यासाठी आधी काही करावे लागेल. या देशात चांगल्या बदलासाठी नेमके काय करावे लागेल, असा विचार केला तर वेगवेगळे शेकडो पर्याय समोर येतात. पण त्यामुळेच ते येतात तसेच विरून जातात. कारण किमान घराच्या चार भिंती बाहेरच्या व्यवस्थेत आम्हाला आधी समन्यायी तत्व ओतावी लागतील, हेच आम्ही विसरून गेलो आहोत.

आज समाजातली सुजाण म्हणविणारी माणसे काय करत आहेत पहा. बदलाचा विषय निघाला की इतिहासात आम्ही किती समृद्ध होतो, किती शूर होतो, आमचे इतिहासपुरुष

कसे आमचे आदर्श आहेत, आमच्या समाजाचे व्यवहार कसे नैतिक होते, याची व्यासपीठांवर वर्षानुवर्षे तीच ती चर्चा होते. कारण ही चर्चा करणाऱ्यांतील बहुतेकांना तो प्रसंग तेवढा साजरा करायचा असतो. टाळ्या मिळवायच्या असतात. किंवा एखादा पुरस्कार पदरात पाडून घ्यायचा असतो. म्हणूनच आपण करत असलेल्या कामामुळे समाजात काही ठोस बदल होताना दिसत नसताना वर्षानुवर्षे पुरस्कार दिले आणि घेतले जातात. काही असे आहेत, त्यांना प्रतिष्ठेसाठी समाजसेवा करायची आहे. खऱ्या बदलाशी त्यांचा काही संबंध नाही, त्यांना समाजसेवकाचा बिल्ला लावायचा आहे. काही असे आहेत, जे गरजूंना मदत करण्यास उतावीळ झाले आहेत. आपण दान देऊ शकतो, याचेच त्यांना समाधान आहे. त्यामुळे गरजू आणि लाचार लोक समाजात असले पाहिजे, असे त्यांना वाटत असते. काही असे, ज्यांनी नव्या तंत्राचा आणि अनुचित मार्गांचा फायदा घेऊन भरपूर पैसा कमविला आहे आणि आता ते प्रतिष्ठेचे भुकेले आहेत. त्यामुळे आपले ऐकणारे कोणीतरी असले पाहिजे, याची व्यवस्था त्यांना करायची आहे. काही असे, ज्यांना परिस्थितीने साथ दिली आहे, पण त्यांना वाटते आपण फार कर्तृत्ववान आहोत.ज्यांना धडपड करूनही यश मिळाले नाही, त्यांना उपदेश करण्यात त्यामुळे ते धन्यता मानतात. काही असे ज्यांनी कधीकाळी काहीएक विचार किंवा इझम स्वीकारला. त्या विचारावर जागतिकीकरणाने वरवंटा फिरविला आहे, मात्र आपल्या विचारात बदल करण्याची हिंमत त्यांच्यात राहिलेली नाही. काही असे, ज्यांना व्यक्तीवादाने एवढे पछाडले आहे की त्यांना त्या व्यक्तीमध्ये एक जादुगार दिसतो आहे. तो जादुगार जादू कधी दाखविणार, याची ते वर्षानुवर्षे वाट पाहत आहेत. काही असे, ज्यांना या देशाचे व्यक्तिमत्व बदलायचे आहे. माणसाची वृत्तीच वाईट आहे, यावर ते ठाम आहेत आणि वृत्ती बदलण्याचा ठेका त्यांनी घेतला आहे. त्या वृत्तीला व्यवस्थेने कसे चोळामोळा करून टाकले आहे, हे त्यांना दिसत नाही. काही असेही, जे भौतिक सुखात लोळत आहेत आणि त्यालाच ते अर्थपूर्ण आयुष्य समजून त्या कैफात जगत आहेत, त्यामुळे किमान सर्व मानव जातीला भेदभावाविना मानवी प्रतिष्ठा देण्याच्या उद्दिष्टापासून ते कोसो दूर आहेत. त्यामुळे आयुष्याचा उद्देश्य शोधण्यापेक्षा पैशाने मिळतील तेवढे समाधानाचे तुकडे जमा करण्यात ते गुंतले आहेत. काही असेही आहेत, ज्यांना जागतिकीकरणाच्या लाटेत खूप काही मिळून गेले आहे, त्यामुळे आधुनिक, समृद्ध जगण्याची आस त्यांना लागली आहे. त्यामुळे देशातील वर्तमान त्यांच्या चिंतेचा विषय आहे. तो बदलण्यासाठी नेमके काय करायला हवे, याचा शोध ते घेत आहेत. ज्या देशात सुजाण म्हणविणारा वर्ग अशा भ्रमात अडकला आहे. त्या देशात 'अच्छे दिन' येण्याचा संबंध येतोच कोठे?

'अच्छे दिन' येण्यासाठी नेमका बदल काय झाला पाहिजे, हे समजून घेणे खरे तर फार काही अवघड नाही. 'अच्छे दिना'ची व्यवस्था म्हणून व्याख्या करायची तर आपल्याला कोणत्याही निकषावर भेदभाव नको आहे. आपल्याला सक्षम सरकार आणि प्रशासन हवे आहे. आपल्याला परवडणारे नव्हे तर आपल्याला हवे आहे असे चांगले आयुष्य जगायचे आहे. आपल्याला विवेकी स्वातंत्र्य हवे आहे. आपल्याला आर्थिक सुरक्षितता हवी आहे. आपले सार्वजनिक आयुष्य आता आहे त्यापेक्षा कितीतरी दर्जेदार हवे आहे. आपल्याला सर्व पातळ्यांवर पारदर्शी व्यवहार हवे आहेत. आपल्याला लाचारी आणि मुजोरी नको आहे. आपल्याला शांत आणि समृद्ध आयुष्य हवे आहे. मानवी प्रतिष्ठा जपण्याचा जो प्रवास विचारी माणूस वर्षानुवर्षे पुढे नेतो आहे, त्या प्रवासात आपल्याला भागीदार व्हायचे आहे. थोडक्यात १२६ कोटी जनतेला एका




धाग्यात बांधणारी व्यवस्था आपल्याला हवी आहे.

आज सर्वांना एकत्र बांधणारे जे चलन आहे, पैसा आहे, त्याने चांगल्या जीवन प्रवासाचा ट्रॅक उखडून टाकला आहे. तो ट्रॅक दीर्घकाळासाठी टाकणारी व्यवस्था आपल्याला हवी आहे. मानवी संबंध आणि वृत्ती या तर त्या त्या माणसाचा आतला परीघ ठरविणार आहेत. त्याविषयी बाहेरील व्यवस्था फार काही करू शकत नाही, मात्र त्या परिघाबाहेरची व्यवस्था चांगली हवी, त्याला आपण 'अच्छे दिन' असे नाव दिले आहे.

असे 'अच्छे दिन' ज्यांना हवे आहेत, त्यांना आधुनिक जगाने पैशाला कसे वाकविले आहे, ते समजून घ्यावेच लागेल. शुद्ध आणि पुरेशी हवा, पाणी आणि रक्त हे जसे आरोग्यदायी जगण्यासाठी आवश्यक आहे, तसेच पैशाचे प्रवाहीपण आणि शुद्धीकरण ही 'अच्छे दिन'ची पूर्वअट आहे. सुजाण म्हणविणारे काही धुरीण त्याच्याविषयी न बोलता भारतीयांच्या वृत्तीवर तेच ते बोलून दिशाभूल करत आहेत. ती दिशाभूल थांबेल, तेव्हा 'अच्छे दिन'चा खरा प्रवास सुरु होईल. तो प्रवास ज्या ट्रॅकवरून होऊ शकतो, त्याचे नाव अर्थक्रांती. अर्थक्रांती समजून घेतली पाहिजे, ती त्यासाठी!